महिला आर्थिक विकास महामंडळ अंमलबजाणीतील लोकसंचलीत साधन केंद्राची भुमिका

एक प्रशासकीय अभ्यास, विशेष संदर्भ : लातूर जिल्हा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सामाजिकशास्त्रे विद्याशाखेतील लोकप्रशासन विषयात पीएच.डी. पदवीसाठी सादर करावयाच्या शोध प्रबंधाचा संक्षिप्त आराखडा

संशोधक

राहुल व्यंकटराव तिगोटे

मु.पो.कुमठा (बु.)

ता.अहमदपूर जि.लातूर - ४१३५१४

संशोधन मार्गदर्शक

प्रा.डॉ.श्यामसुंदर वाघमारे

लोकप्रशासन विभाग प्रमुख ,

शारदा महाविद्यालय परभणी ता.जि.परभणी

संशोधन केंद्र

नेताजी सुभाषचंद्रबोस महाविद्यालय,नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ , नांदेड

एप्रिल - २०१९

महिला आर्थिक विकास महामंडळ अंमलबजाणीतील लोकसंचलीत साधन केंद्राची भुमिका एक प्रशासकीय अभ्यास, विशेष संदर्भ : लातूर जिल्हा

प्रस्तावना :-

विकासाच्या संकल्पनेत देशाची अथवा समाजाची सर्वांगिण प्रगती अभिप्रेत असते. त्यामध्ये सामाजिक व आर्थिक व्यवस्थांचा चांगल्या व अधिक मानुषी अशा व्यवस्थांची सातत्याने होणारे उत्थांन अपेक्षित आहे. विकास प्रक्रियेत देशातील नागरिकांचा सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, संस्कृतीक इत्यादी आयामे महत्वपूर्ण ठरतात. राज्याला आपल्या नागरिकांना भयमुक्तीपासून वाचविणे आणि त्यांचा विकास करणे ही लोकशाही शासनाची जबाबदारी आहे. विकास या संकल्पनेत सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतीक परिस्थितीत परिवर्तन होत असते तर कधी त्या पुनराभिमूख बनत असतात. यामध्ये सामाजातील चालिरीती बदलतात. पुढे जाऊन मानसिकता बदलत असते. आणि सक्षमता निर्माण होते.

समाजाचा विकास ही निरंतर चांलणारी प्रक्रिया असून विकास प्रक्रियेच्या टप्यावर सर्वसामान्य माणसांचा विकास हाच ध्यास शासनाचा असला पाहिजे. भारतात विविध जातीचे, धर्माचे, वंशाचे, पंथाचे लोक एकत्र राहतात. भारतात विविधता असली तरी ते एकात्मतेने जिवण जगतात. प्राचीन काळात राजे मध्युगीन काळ ब्रिटीशांच्या काळात माणसांना जगणे कठीण झाले होते. विकासापासून भारतीय समाज कोसो दूर गेलेला होता. त्यामध्येच भर म्हणून देशातील सामाजिक परिस्थिती विषमतेवर आधारलेली होती. मनुस्मृतीने ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्रअतिशुद्र वर्ण पाडून प्रत्येकाला त्यांच्या पायरीप्रमाणे, तत्वाप्रमाणे जगण्याची मर्यादा घालून दिलेली होती. शुद्रअतिशुद्रावर जी बंधने होती तीच बंधने भारतीय समाजाने स्त्री ला घातलेली होती. महिलांना चूल आणि मूल एवढीच जबाबदारी होती. समाजाने बंदिस्त केलेल्या महिलांचा विकास त्याही काळातील समाजसुधारकांना व्हावा असे वाटायचे त्यांनी स्वतःला त्या कार्यात झोकून दिले. महिला शोषित, दुर्बल, मागास आणि आर्थिकदृष्टया फारच कमकुवत बनल्या होत्या. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून घटनाकाराने सामाजिक, आर्थिक, राजनैतिक, न्याय, विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा व उपासणा याचे स्वातंत्र्य दिले, समानता भारतीयांना अर्पण केलेली आहे. महिला सक्षम होणे अपेक्षीत असले तरी तेवढेच ते कठीण काम आहे. जातीच्य, धर्माच्या, संस्कृतीच्या जोखडात महिला पूर्णतः बंदिस्त झालेली होत्या. त्यातून त्यांना बाहेर कठिण व आवघड काम होते. स्वातेत्र्योत्तर काळात महिलांच्या कल्याणासाठी अनेक शासकीय योजना राबविण्यात आल्या. सन -१९६० पासून स्त्री सक्षमीकरणाची चक्रे वेगाने वाहु लागली. त्याचाच भाग म्हणून अंतराष्ट्रीय महिला वर्षाचा सुवर्णमध्य साधून २४, फेब्रवारी १९७५ साली महाराष्ट्र शासन अंगीकृत महिला आर्थिक विकास महामंडळाची स्थापना केली.भारताच्या महामहीम माजी राष्ट्रपती मा.श्रीमती प्रतिभाताई पाटील या पहिल्या अध्यक्ष राहिलेल्या आहेत. पुढील ३०-३५ वर्षाच्या वाटचालीत महिला सक्षमीकरण हा विषय केंद्रस्थानी ठेवण्यात आला आहे. ही प्रक्रिया २० व्या शतकापर्यंत मर्यादित नसून ती अनेक शतकाच्या प्रयत्नांचे फळ असणार आहे. सन २००० हे वर्ष महिला सक्षमीकरणाचे मानले जात असले तरी स्वतंत्र्यपूर्व काळात महिला

सक्षमीकरणासाठी छत्रपती शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले सावित्रिबाई फुले या मान्यवरांनी मुलींच्या शिक्षणाचा आग्रह धरून शाळा स्थापन करून एक नवी दिशा दिली. तोच धागा भारतीय राज्यघटनेने स्विकारलेला असून स्त्री पुरूष यांच्यात समानता जपलेली आहे.

महिला आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करून ग्रामीण भागातील महिलांचा सक्रिय सहभाग आर्थिक चळवळित वाढविण्या करिता. गावोगावी स्वंय सहाय्यता बचत गटाची चळवळ वेगाने वाढविण्या मध्ये लोकसंचलित साधन केंद्राची भूमिका महत्वपूर्ण वाटते. परिणामी बचतगटामुळे बचत संकल्पनेच्या कामाला चालना मिळून पत निर्मितीद्वारे रोजगार निर्माण करून ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत होत आहे. विशेषतः ग्रामीण भागात स्वंयसहाय्यता बचतगटाकडे महिलांचा आत्मविश्वास, आत्मनिर्भरता वाढत असून महिला अधिक सक्षम व्हावेत व महिलामधील अंगभूत-असणाऱ्या क्षमतांना आकार देण्यासाठी महिलांचे सक्षमिकरण करण्याचा प्रयत्न माविम कडून केला जात आहे.

समस्यासुत्रण :-

विकसनशिल राष्ट्रातील गरिबी हटवून विकास करणे फार कठीण व गुंतागुंतीचे ठरते. कारण समाजातील विषमतेशी संबंध येतो. माणूस माणसापासून, समाज समाजापासून दूर जातो आणि प्रगती होण्याऐवजी अधोगती होते. हे टाळण्यासाठी सरकारला सामाजिक समता, न्याय, बंधुता निर्माण करण्यासाठी लोक कल्याणंच्या अभिनव योजनांची आखणी करून त्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे आश्यकत ठरते. महिला विकासाकडे वाटचाल करित असताना अल्पउत्पन्न, दारिद्रय, बेकारी, अल्पउत्पादकता, पायाभुत सेवांचा अभाव, अपुरे भांडवल सामाजिक विषमतेमध्ये चोहोबाजूंनी बंदिस्त झालेल्या महिलानां या समस्यां मोठया प्रमाणावर भेडसावत असतात. याची जाणीव भारतीय घटनाकारांना होती म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी असे मत मांडले की, आर्थिक स्थिरता ही समाजिक व राजकीय पुनरजीवनाचा पाया आहे. स्त्री-पुरूष समानता हे भारतीय राज्यघटनेचे आधारभूत तत्व ठरविले आहे. सर्वसामान्य माणसाचा विकास हेच ध्येय निश्चीत केले महिलांना संघटीत करून प्रशिक्षणाच्या माध्यमातून त्यांची क्षमतावृध्दी वाढवीणे, त्यांच्यातील आत्वविश्वास वाढवुण आणि महिलांमधील उद्योजकतेचा विकास करून अर्थिक सहाय्य व बाजारपेठ उपलब्ध करून देणे, शिक्षणाची संधी, राजसत्तेत व निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढविण्यासाठी महिला आर्थिक विकास महामंडळाची (माविम) स्थापना करण्यात आली.

महिला आर्थिक विकास महामंडळाने (माविम ने) १९९४ साली अंतरराष्ट्रीय कृषि विकास निधी (आयफॅड) सहाय्याने महाराष्ट्र ग्रामीण पतरपुरवठा कार्यक्रमाच्या माध्यमातून स्वंय सहाय्यता बचत गटाच्या निर्मितीचे कार्य हाती घेतले या कार्यक्रमाला मिळालेली यशस्विता महिला आर्थिक विकास महामंडळास एक नवी दिशा दिली. महाराष्ट्र ग्रामीण पतपुरवठा कार्यक्रमाच्या यशस्वी अनुभवाच्य आधारावर महाराष्ट्रात महिला सक्षमीकरणाची चळवळ सुरू करण्यात आली. आजमितीला महाराष्ट्रासारख्या पुरोगांमी राज्यात स्वंय सहाय्यता बचत गटाची चळवळ जोमाने फोफावली असून एक दशकापेक्षा अधिक कालावधी पूर्ण झालेला आहे. मानव संसाधनामध्ये गुंतवणूक व महिलांची क्षमता वृध्दी करून महिलांना आर्थिकदृष्टया व सामाजिक दृष्टया सक्षम करून महिलांना शास्वत स्थाई उपजिवीका उपलब्ध करून देणे हा आहे. महाराष्ट्रात महिला सक्षमीकरणाची चळवळ पुढे नेणारा प्रकल्प आयफॅड द्वारे राबविण्यात यावा अशा स्वरूपाची शिफारस महाराष्ट्र शासनाने केली होती. त्या मधूनच स्वर्ण जयंती ग्राम

स्वंययोजना, रमाई महिला सक्षमीकरण आणि तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण अशा कार्यक्रमाची आखणी करून शासन महिला सक्षमीकरणाचे कार्य निरंतरपणे चालवित आहे. एखादा दुसरा प्रकल्प अल्प कालावधीत पूर्ण होणारी बाब नाही. कोणी कितीही यशस्वी प्रकल्प राबविले तरी प्रकल्प कालावधी संपल्यानंतर काही काळानंतर प्रकल्प कालावधीत केलेल्या कामाचे परिणाम चिरकाल टिकताना दिसतात. अनेकदा केलेले प्रयत्न वाया जातात. विकासाच्या पुढच्या टप्यावर समाजाच्य तळाच्या घटकाला टिकून राहायचे असेल तर लोकसंचलित साधनकेंद्र म्हणजे (CMRC) ही. संकल्पना पुढे आली. ही एक (NGO) महाराष्ट्रासाठी व महिला आर्थिक विकास महामंडळाकरिता नवीन होती. ही संकल्पना समजून घेऊन प्रत्यक्षपणे राबविणे हे माविम ला मोठे आव्हान होते. ते पूर्ण करण्याकरिता महिला आर्थिक विकास महामंडळाने दक्षिण भारतात दौरे करून अशा संकल्पनेचा अभ्यास केला, कार्यशाळा घेतल्या व तद्नंतर लोकसंचलित साधन केंद्राची व आपल्या मातीत रूजणारी संकल्पना निश्चीत केली. ही संकल्पना विकसित करताना जिल्हा व मुख्यालयीन अनेक अधिकारी, कर्मचारी तसेच गावातील बचतगटातील महिलांना संधी दिली जाते. महिला आर्थिक विकास महामंडळाने राज्यात स्थापन केलेल्या ५७००० हजार पेक्षा अधीक स्वंय सहाय्यता बचत गटांसाठी ३१५ लोकसंचलित साधनकेंद्र स्थापन केली. लोकांनी लोकांच्या विकासा करिता स्वतः चालविलेली संस्था म्हणजे लोकसंचलित साधन केंद्र होय. १५-२० कि.मी. परिघामध्ये येणाऱ्या २५-३० गावातील सर्वसाधारणपणे २०० गटांचे संघटन केले जाते. येथूनच महिला सक्षमीकरणासाठीच्या विविध योजनांची अंमलबजावणी केली जात असते. त्या कार्यालयाच्या मूल्यमापनाची गरज निर्माण झालेली आहे. स्वंय सहाय्यता बचत गटाच्या लाभामूळे महिलांनी विकास करून घेतला आहे का? महिला सक्षमीकरणासाठी कोणत्या पध्दतीचा उपयोग केला. याचा प्रशासकीय अभ्यास करण्यासाठी संशोधकाने समस्या म्हणून महिला आर्थिक विकास महामंडळाच्या कर्यातील लोकसंचलित साधनकेंद्राची भूमिका एक प्रशासकीय अभ्यास, विशेष संदर्भ लातूर जिल्हा असा विषय निश्चीत केलेला आहे.

संधोनाची उद्दिष्टे :-

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने काही उद्दिष्टांची मांडणी पुढीलप्रमाणे केलेली आहे.

१. महिला आर्थिक विकास महामंडळाद्वारे निर्माण करण्यात आलेल्या महिला स्वंय सहाय्यता बचत गटाची महिला सक्षमीकरणातील भूमिकेचा आढावा घेणे.

२. लातूर जिल्हयातील महिला सक्षमीकरणासाठी महिला आर्थिक विकास महामंडळाने कोण-कोणती धोरणे, कार्यक्रम आणि योजनांची निर्मिती केली यांचा अभ्यास करणे.

३. महिला आर्थिक विकास महामंडळाच्या कार्यातील लोकसंचलित साधन केंद्राचा प्रशासकीय अभ्यास.

४. लातूर जिल्हयातील महिलांची स्वयं सहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून आर्थिक, सामाजिक, राजकीय व शैक्षणिक सक्षमीकरण होण्यास मदत झाली आहे काय? याचा शोध घेणे.

५. स्वंय सहाय्यता बचत गटाद्वारे महिलांना संघटीत करून प्रशिक्षण देऊन त्यांची क्षमतावृध्दी, आत्मविश्वास वाढला काय? याचे अध्ययन करणे.

६.	लातूर जिल्हयातील महिला सक्षमीकरणसाठी निर्माण करण्यात आलेल्या योजनेच्या अंमलबजावणीतील उणिवा व समस्यांचा शोध घेणे व त्यादृष्टीने सुधारणात्मक ठोस उपायोजना सूचविणे.

गृहितके :-

१.	स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून लातूर जिल्हयातील महिलांचा समाजिक, आर्थिक व राजकीय सक्षमीकरणास चालना मिळाली आहे.

२.	स्वयंसहाय्यता बचतगटांमूळे लातूर जिल्हयातील महिलांचा स्थानिक पातळीवरील निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढलेला आहे.

३.	लातूर जिल्हयातील लोकसंचलित साधनकेंद्र महिला सक्षमीकरणासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करीत आहे.

४.	ग्रामीण भागातील महिला सक्षमीकरणासाठी शासनाला अपेक्षित यश प्राप्त होऊ लागलेले आहे.

५.	लोकसंचलित साधन केद्राने लातूर जिल्हयामध्ये माविम च्या योजनांची अंमलबजावणी यशस्वीपणे केल्याचे दिसून येते.

संशोधन पध्दती :-

संशोधक प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग करणार आहे. तसेच तथ्य संकलन करण्यासाठी प्राथमिक आणि दुय्यम साधन सामुग्रीचा उपयोग घेणार आहे.

**१.	प्राथमिक स्त्रोत :-**

सदरील संशोधनासाठी संशोधक प्राथमिक साधन सामुग्रीसाठी लातूर जिल्हयातील लोकसंचलित साधन केंद्र व महिला बचतगटाचा समग्र म्हणून समावेश करणार आहे. त्यांच्याकडून मुलाखत-अनुसूची या तंत्राद्वारे माहिती (तथ्य) संकलित करणार आहे.

**२.	द्वितीय स्त्रोत :-**

सदरील संशोधनात संशोधकाने प्राथमिक स्त्रोताला पुष्टी देण्यासाठी द्वितीय स्त्रोता मुळे संदर्भग्रंथ, अप्रकाशित शोधप्रबंध, नियतकालिके, मासिके, साप्ताहिके, दैनिक वृत्तपत्रे, महाराष्ट्र शासनाचे संबंधित विभागाचे वार्षीक अहवाल, शासकीय प्रकाशने तसेच इंटरनेटचा आणि लोकसंचलित साधनकेंद्राचा वापर करणार आहे.

नमुनानिवड :-

महिला आर्थिक विकास महामंडळाकडून लाभ घेणाऱ्या स्वंय सहाय्यत बचत गटाच्या २०११ पर्यंत लोकसंचलित साधन केंद्राने अमलबजावणी केलेल्या योजना यासाठी जिल्हयातील प्रत्येक तालुक्याचे एक लोकसंचलित साधन केंद्र व ४० महिला स्वंय सहाय्यतास गटांची व प्रत्येक गटातील ७ सदस्यांची संहितूक नमूना निवड पध्दतीनूसार निवड करण्यात येणार आहे.

संशोधनाची व्याप्ती :-

सदरील संशोधन कार्य हे महाराष्ट्र राज्यातील लातूर जिल्हयातील महिलांचा समग्र म्हणून वापर करणार आहे. त्याचबरोबर लोकसंचलित साधन केंद्रा द्वारे योजनेच्य अंमलबजावणीचा पूर्णत: विचार करण्यात येणार आहे.

संशोधनाची मर्यादा :-

कोणत्याही संशोधनासाठी संशोधकाला वेळ, काळ, व पैसा याबाबतीत मर्यादा पडतात तशाच मर्यादा याही संशोधनामध्ये संशोधकाला पडणार आहे. कारण सदरील संशोधन हे फक्त लातूर जिल्हयातील लोकसंचलित साधन केंद्र व महिला आर्थिक विकास महामंडळाच्या लाभार्थी असलेल्या महिलांचा अभ्यास करणार आहे. त्याचबरोबर इ.स.२०१४-२०१९ या काळा निर्माण करण्यात आलेल्या महिला स्वंय सहाय्यता गटांचा अभ्यास करणार आहे. करिता या सर्व बाबी संशोधनाच्या दृष्टीने मर्यादित वाटतात.

प्रकरण आराखडा :-

१. प्रकरण पहिले :- प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणात संशोधनाचा विषय प्रवेश, संशोधनाचे महत्व व आवश्यकता महिलांचा प्राचिन काळापासून ते सद्यपरिस्थितीपर्यंतचा दर्जा आणि स्थानाचा आढावा घेण्यात येणार असून लोकसंचलित साधन केंद्र विषय निवड करून समस्यासुत्रण मांडणार आहे. यासाठी संशोधन उद्दिष्टये, गृहितके, संशोधन पध्दती व प्रकरण निहाय विभागणी अशी मांडणी करण्यात येणार आहे.

२. प्रकरण दुसरे :- लोकसंचलित साधन केंद्र व स्वंय सहाय्यत बचत गट

महिला सक्षमीकरणाची वाटचाल प्रस्तुत संशोधनाच्या शोधप्रबंधाच्या दुसऱ्या प्रकरणात संशोधक हा सक्षमीकरण तसेच महिला सक्षमीकरण यांची संकल्पनात्मक सैंधातिक मांडणी करणार आहे. त्यानंतर लातूर जिल्हयातील महिला सक्षमीकरणासाठी सरकारची धोरणे, योजना व कार्यक्रमाची अभ्यासपूर्ण मांडणी करित असताना लातूर जिल्हयातील लोकसंचलित साधन केंद्राची भूमिका मांडणार आहे.

३. प्रकरण तिसरे :- स्वंयसहाय्यता बचतगट - संकल्पना व स्वरूप

या प्रकरणात स्वंय सहाय्यता बचत गटांची ऐतिहासिक पार्श्वभूमी, जागतिक संदर्भ, भारतातील स्वयसहाय्यता गट चळवळ, महाराष्ट्रातील स्वयंसहाय्यता गट चळवळ, स्वंय सहाय्यता गट संकल्पना व कार्यपध्दती, गटांचा अर्थ व स्वरूप, गटांची निर्मिती, रचना, बांधणी, वैशिष्टये आणि गटांचे महत्व या बाबींची सखोल माहिती मांडणार आहे.

४. प्रकरण चौथे :- महिला सक्षमीकरणाच्या फलनिष्पतीचा प्रशासकीय अभ्यास

५. प्रकरण पाचवे :- निष्कर्ष आणि शिफारसी

संदर्भग्रंथ :-

1. Agawal Menu, Women Empowerment, Today's vision for Tomorrow's Mission, Mahamaya Publication, New Delhi, 2007
2. Churasia B.P. (Ed.); Women Status In India, Ghough Publication, Alhabad, 1992.
3. Harper M., Self-Help Groups and Gramin Bank Groups, What are the difference, Vistaar Publication, New Delhi, 2002.
4. Banu Zenab, Tribal Women Empowerment and Gender Issues, Kanishka Publishers, New Delhi, 2001.
5. Sarojini Nayar, Jeevan Nayar, Women Empowerment in India, Pointer Publication, Japur,2005.
6. गुप्ता कमलेशकुमार, महिला सशक्तीकरण, बुक एनक्लेब, जयपुर, 2007.
7. सिंह मिनाक्षी निशांत, महिला सशक्तीकरण का सच, आमेया पब्लिकेशन, दरियागंज, नई दिल्ली, 2005.
8. साबळे चि.ग., महिलांचे सबलीकरण, दारिद्रय निर्मूलन व स्वयंसहाय्यता गट, यशदा, पुणे 2003.
9. लोकराज्य माहिती व जनसंपर्क महासंचनालय, महाराष्ट्र शासन

संशोक

राहुल व्यंकटराव तिगोटे

मु.पो.कुमठा (बु.)

ता.अहमदपूर जि.लातूर

संशोधन मार्गदर्शक

प्रा.डॉ.श्यामसुंदर वाघमारे

लोकप्रशासन विभाग,

शारदा महाविद्यालय, परभणी

ता.जि.परभणी